दुरितांचे तिमिर जावो!

शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित

# जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

# राष्ट्रीय सेवा योजना

## सन २०१९—२०

150 YEARS OF CELEBRATING THE MAHATMA

# वार्षिक विशेष शिबीर अहवाल

**प्रा.सुर्यकांत आगलावे**
कार्यक्रमाधिकारी तथा
उस्मानाबाद जिल्हा समन्वयक रा.से.यो.

**प्रा.डॉ.गुंडू राठोड**
कार्यक्रमाधिकारी

**डॉ.उमाकांत चनशेट्टी**
प्राचार्य
जवाहर महाविद्यालय, अणदूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद

# जवाहर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,अणदूर

ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ४१३६०३

## राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक विशेष शिबीर सन २०१९–२०

# अहवाल

**जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वार्षिक विशेष शिबीर मौजे बारूळ ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद येथे दि. २८/१२/२०१९ ते दि.३/१/२०२० दरम्यान पार पडले. शिबीरात विद्यापीठाच्या १०० विद्यार्थ्यांच्या मंजुरीनुसार ५० मुले, ५० मुली, ४ प्राध्यापक व १ शिपाई इत्यादी सहभागी होते. शिबीराचा विषय ‘‘पर्यावरण संवर्धनासाठी युवा’’ असा होता. शिबीरात खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.**

पहिला दिवस: शनिवार दि.२८/१२/२०१९ रोजी शिबीराच्या पहिल्या दिवशी विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी दु. १२ वाजता महाविद्यालयातून बारूळकडे रवाना झाले. बारूळ येथे पोहोंचल्यानंतर विद्यार्थ्यांनी बाळेश्वर मंदिर चौक



व जिल्हा परिषद शाळेच्या आवारात म्हणजे निवासाच्या ठिकाणी स्वच्छताकेली.



काही विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाची तयारी केली. काही विद्यार्थ्यांनी भोजनाची व्यवस्था केली. व काहींनी गावातील लोकांना उद्घाटन कार्यक्रमाला येण्याचे आमंत्रण दिले. शिबीर उद्घाटनाचा कार्यक्रम बाळेश्वर मंदिरात सायंकाळी ६ वाजता घेण्यात आला.



उद्घाटक म्हणून सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू श्री इरेश स्वामी उपस्थित होते. शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरचे सचिव आदरणीय सि.ना.आलुरे गुरूजी यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटनाचा कार्यक्रम झाला. प्रथम दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरूवात झाल्यानंतर प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी केले.



गावातील पत्रकार श्री.सुधिर सूपणार व आदर्श शिक्षक श्री दत्तात्रय सगर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शिबीराचे उद्घाटक श्री इरेंश स्वामी सरांनी विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना सविस्तर मार्गदर्शन करून शिबीराबद्दल माहिती सांगितली.







अध्यक्षीय समारोपात श्री.सि.ना.आलुरे गुरूजी यांनी विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना श्रम संस्काराबद्दल माहिती सांगितली.



प्रास्ताविक प्रा.डॉ.मल्लिनाथ बिराजदार यांनी तर आभार जिल्हा समन्वयक प्रा.सुर्यकांत आगलावे यांनी मानले.



कार्यक्रमासाठी बारूळचे सरपंच शिवाजी सूपनार, माजी सरपंच बाबुराव ठोंबरे, संस्थेचे संचालक श्री.गो.का.बिच्चे व श्री विवेकानंद स्वामी, प्राध्यापक, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. वंदे मातरम् गितानंतर सांगता झाली.



# बारुळ येथे जवाहर विद्यालयाचे शनिवारपासून युवा शिबिर

**कुलगुरू डॉ. स्वामी यांच्या हस्ते होणार उद्घाटन**

**अणदूर** : येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने तुळजापूर तालुक्यातील बारुळ येथे २८ डिसेंबर ते ३ जानेवारी या कालावधीत पर्यावरण संवर्धनासाठी युवा शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापक व बारूळ ग्रामस्थ सहभागी होत असून या शिबिराचे उदघाटन सोलापूर विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार सौदागर तांदळे हे उपस्थित राहणार आहेत. माजी आ. सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे उदघाटन होणार आहे. शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, श्रमदान, महिला मेळावा, शेतकरी मेळावा, वनराई बंधारा, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, आरोग्य शिबीर, समाज व युवक प्रबोधन, पशुचिकित्सा शिबिर या व अशा प्रकारची अनेक उपक्रमांनी हे शिबिर घेण्यात येत आहे.

फ्रामध्ये प्रा. डॉ. संतोष पवार, पं. स. सभापती शिवाजीराव गायकवाड, प्रा. किरण सगर, प्रा. डॉ. शीला स्वामी, एस. एल. सूर्यवंशी यांची व्याख्याने होणार आहेत. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उस्मानाबाद जिल्हा समन्वयक प्रा. एस. डी. आगलावे आणि कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जी. टी. राठोड हे या शिबिराचे व्यवस्थापन करत आहेत.



# बारुळ येथील शिबिराचे माजी कुलगुरू स्वामींच्या हस्ते उद्घाटन

पुण्य नगरी। वृत्तसेवा

**बारुळ** : तुळजापूर तालुक्यतील बारुळ येथे शनिवारी (दि.२८)जवाहर कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय अणदूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शिबीर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू इरेश स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार सि. ना. आलूरे, जी. के बिच्चे, सरपंच शहाजी सुपणार, बाबुराव ठोंबरे, सुभाष पाटील, व्ही. शिवराम वट्टे, राजकुमार वट्टे, बाबुराव वट्टे, प्राचार्य उमाकांत चनशेट्टी, विवेकानंद स्वामी, पी.के कुलकर्णी उपस्थित होते. हे शिबीर ३ जानेवारी पर्यंत चालणार असून शिबिरामध्ये पर्यावरण संवर्धन, ग्राम स्वछता, समाज प्रबोधन, कृषी माहिती आदी विषयावर चर्चा व माहिती दिली जाणार आहे. यावेळी कुलगुरू इरेश स्वामी यांनी सेवा योजना शिबिराचे महाविद्यालयीन जीवनातील महत्व याविषयीची माहिती दिली. तसेच अशा शिबिरांच्या माध्यमातून जीवनात कष्ट करण्याची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. याप्रसंगी नबीलला शेख, कमलाकर ठोंबरे, बाबुराव व्होटें, नटराज ठोंबरे, दत्तात्रय सगर, शिवलिंग ठोंबरे, प्रा. एस. डी. आगलावे,प्रा. एस. एस. ठोंबरे, जी. टी. राठोड, श्रीमती भरती मॅडम, श्रीमती एस. एन. कबाडे, राजेंद्र हजारे, जयप्रकाश वट्टे, तानाजी रणदिवे यांच्यासह बाळेश्वर विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.



२

# जवाहर महाविद्यालयाचे आजपासून रासेयो शिबिर

प्रतिनिधी | अणदूर

येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यावरण संवर्धनासाठी युवा' या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिराचे २८ डिसेंबर ते ३ जानेवारी दरम्यान आयोजन करण्यात आले आहे.

तुळजापूर तालुक्यातील बारुळ येथे हे शिबिर होणार आहे. शिबिरात महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक यांच्यासह बारुळ ग्रामस्थ सहभागी होणार आहे. शिबिराचे उद्घाटन सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून तुळजापूरचे तहसीलदार सौदागर तांदळे उपस्थित राहणार आहेत. शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सि. ना. आलुरे गुरुजी अध्यक्षस्थानी राहणार आहेत. शिबिरात प्रा. संतोष पवार (नळदुर्ग), पंचायत समिती सभापती शिवाजीराव गायकवाड, प्रा. किरण सगर (उमरगा), प्रा. डॉ. शिला स्वामी (मुरुम), एस. एल. सूर्यवंशी (कृषी विज्ञान केंद्र तुळजापूर) यांचेही मार्गदर्शन लाभणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे जिल्हा समन्वयक प्रा. एस. डी. आगलावे आणि कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जी. टी. राठोड हे शिबिराचे नियोजन व व्यवस्थापन करीत आहेत. या शिबिरात ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, श्रमदान, महिला मेळावा, शेतकरी मेळावा, वनराई बंधारा, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, आरोग्य शिबिर, समाज व युवक प्रबोधन, पशुचिकित्सा शिबिर आदी उपक्रमांच्या माध्यमातून शिबिरार्थी विद्यार्थी श्रमदान व जनजागृती करणार आहेत.

**दुसरा दिवस:** रविवार दि.२९/१२/२०१९ रोजी शिबीराच्या दुसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर उठून प्रात:विधी झाल्यानंतर सकाळी ६ ते ८ या वेळेत प्राणायम, योगासने व प्रार्थना गायनाचा कार्यक्रम केला. आल्पोपहारानंतर सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत श्रमदानामध्ये विद्यार्थ्यांनी सांडपाणी व्यवस्थापन करतांना जिल्हा परिषद शाळेच्या आवारात येणारे सांडपाणी अडवून त्याला वाट करून दिली.





गावातील प्रमूख रस्ते साफ करून कचरा उचलून टाकला. दुपारच्या सत्रामध्ये भोजनानंतर दु.३ ते ५ या वेळेत प्रा.डॉ. मल्लिनाथ बिराजदार व डॉ.नागनाथ कुंभार यांचे मार्गदर्शन झाले. बिराजदार सरांनी राष्ट्रीय सेवा योजनेत युवकांचे योगदान या विषयावर तर डॉ. नागनाथ कुंभार यांनी युवकांची व्यसनाधिनता या विषयावर मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अरूण राठोड या स्वयंसेवकाने केले. सायंकाळच्या सत्रामध्ये सायंकाळी ७ ते ९ दरम्यान पंचायत समिती तुळजापूर चे सभापती श्री शिवाजीराव गायकवाड यांचे **‘सेंद्रीय शेती व जलव्यवस्थापन’** या विषयावर मार्गदर्शन झाले.



अध्यक्षस्थानी गावचे सरपंच श्री शिवाजी सुपनार हे होते. प्रा.एस.एस.ठोंबरे व प्रा.डॉ.बिराजदार प्रमूख उपस्थितीमध्ये होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विद्यार्थी ओंकार कर्पे यांनी केले. प्रमूख पाहूणे श्री गायकवाड यांनी उपस्थित शेतकरी व विद्यार्थी यांना सेंद्रीय शेती व जलव्यवस्थापन या विषयावर सविस्तर

मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

**तिसरा दिवस:** सोमवार दि.३०/१२/२०१९ रोजी शिबीराच्या तिसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर उठून प्राणायम, योगासने व प्रार्थना नंतर अल्पोपहार घेतला.



नंतर सकाळी ९ ते दुपारी १ दरम्यान श्रमदानामध्ये ठोंबरे सरांच्या घरासमोरून जाणाऱ्या रस्त्यावर येत असलेल्या सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी शोष खड्डे घेतले.



विद्यार्थीनींनी सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता करून घेतली. भोजनानंतर दुपारच्या सत्रामध्ये कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, नळदुर्ग चे प्रा.डॉ संतोष पवार यांचे **''युवका युवका जागा हो, राष्ट्र उभारणीचा धागा हो''** या विषयावर मार्गदर्शन झाले.



कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून इतिहास विभाग प्रमूख डॉ. सुनिल रजपूत हे होते. कार्यक्रमाला प्रा.डॉ.राजशेखर वरशेट्टी व गावातील युवक उपस्थित होते. सायंकाळच्या सत्रामध्ये सायं ७ ते ९ दरम्यान आदर्श महाविद्यालय उमरगाचे प्रा.किरण सगर यांचे **''अंधश्रद्धा निर्मुलन सप्रयोग व्याख्यान''** या विषयावर मार्गदर्शन झाले. प्रा.किरण सगर यांनी जादूटोणा, भानामती, करणी कशी केली जाते. व गावातील महिला त्यामध्ये कशाप्रकारे फसतात हे सप्रयोग करून मार्गदर्शन केले.



अध्यक्षस्थानी बारूळचे आदर्श शिक्षक श्री दत्तात्रय सगर हे उपस्थित होते. त्यांनी ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी गावातील महिला मोठया संख्येने उपस्थित होत्या.


**चौथा दिवस:** मंगळवार दि.३१/१२/२०१९ रोजी शिबीराच्या चौथ्या दिवशी सकाळी लवकर उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली. अल्पोपहारानंतर सकाळी ९ ते दुपारी १




दरम्यान श्रमदानामध्ये सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डे घेतले व काही विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली.



शोषखड्डे खोदतांना त्यामध्ये निघालेला मुरूम व माती रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी उपयोगात आणली. दुपारच्या सत्रामध्ये ३ ते ५ दरम्यान विद्यार्थी विद्यार्थीनी व प्राध्यापक यांनी महिला सशक्तीकरण जनजागरण रॅली गावातून काढली. त्यामध्ये विद्यार्थी विद्यार्थीनी मुली वाचवा व महिला सशक्तीकरणाच्या घोषणा मोठया आवाजात दिल्या तसेच मुलींनी



गावातील महिलांना सांयकाळच्या कार्यक्रमासाठी येण्याचे आमंत्रण दिले.





रॅलीनंतर सायंकाळी ५ ते ७ दरम्यान माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूमच्या प्रा.डॉ.शिला स्वामी यांचे महिला मेळाव्यामध्ये **''जागर महिला शक्तीचा''** या विषयावर मार्गदर्शन

झाले.





कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या सर्व प्राध्यापिका, गावातील महिला व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.अनिता मुदकण्णा ह्या होत्या. त्यांनीही महिलांना मार्गदर्शन केले. आभार प्रा.डॉ.सुरेखा भारती यांनी मानले. रात्री १० पासून नविन वर्षाचे स्वागत भजन गायनाने, भावगीताने व भक्तीगीताने केले.

**<u>पाचवा दिवस:</u>** बुधवार दि.१/१/२०२० रोजी शिबीराच्या पाचव्या दिवशी विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर उठून प्राणायम, योगासनानंतर प्रत्येकाने एक सुविचार सांगून स्वत:ची ओळख करून दिली. अल्पोपहानंतर सकाळी ९ ते दुपारी १ दरम्यान श्रमदानातून गावाच्या पश्चिमेला असलेल्या नदीवर वनराई बंधारा तयार केला. त्यावेळी वनराई बंधारा कसा करावा, का करावा व त्याचे फायदे कार्यक्रमाधिकारी प्रा. सुर्यकांत आगलावे व प्रा.डॉ.गुंडू राठोड यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.





दुपारच्या सत्रामध्ये ३ ते ५ दरम्यान इंग्रजी विभागाचे प्रा. विवेकानंद वाहूळे यांनी **'स्वच्छता, सेवा आणि समाज'** या विषयावर मार्गदर्शन केले.



अध्यक्ष स्थानी प्रा.डॉ.सुरेखा भारती या होत्या. कार्यक्रमाचे नियोजन एका गटातील विद्यार्थ्यांनी केले. सायंकाळच्या सत्रामध्ये सायं ७ ते ९ दरम्यान शेतकरी मेळावा घेण्यात आला. प्रमूख पाहूणे कृषी विज्ञान केंद्र तुळजापूरचे प्रमूख व वरिष्ठ शास्त्रज्ञ श्री.सुर्यवंशी एस.एल. यांनी **''शेतीपूरक व्यवसाय''** या विषयावर मार्गदर्शन केले.



अध्यक्ष स्थानी टाटा सामाजिक विज्ञान संस्था, तुळजापूरचे सामाजिक कार्यकर्ते श्री.गणेश चांदरे हे होते. त्यांनीही गावातील शेतकरी व विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व शेतकरी मोठया संख्येने उपस्थित होते.

**सहावा दिवस:** गुरूवार दि.२/१/२०२० रोजी शिबीराच्या सहाव्या दिवशी विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर उठून प्राणायम, योगासने केली. अल्पोपहारानंतर सकाळी ९ ते दुपारी १ दरम्यान श्रमदानामध्ये विद्यार्थ्यांनी वनराई बंधारा पूर्ण केला.



काही विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळेच्या आवारात झाडे लावण्यासाठी खड्डे खोदले.



काही विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता केली. दुपारच्या सत्रामध्ये ३ ते ५ दरम्यान गट चर्चा करण्यात आली. गट चर्चेमध्ये शिबीराचा विषय **''पर्यावरण संवर्धनासाठी युवा''** हा असल्यामुळे त्याला अनुसरून काही विषय विद्यार्थ्यांना ठेवले होते. त्यामध्ये १.जल सवंर्धन २.वृक्ष संवर्धन ३.सांडपाणी व्यवस्थापन ४.सार्वजनिक स्वच्छता ५. घनकचरा व्यवस्थापन ६.पाणी आडवा पाणी जिरवा ७. प्रदुषण मुक्त हवा इत्यादी विषयावर प्रत्येक गटाने एक विषय घेवून चर्चा केली.



त्यातून महत्वाचे मुद्दे तयार करून प्रत्येक गटातील एका विद्यार्थ्याने त्याचे सादरीकरण केले.



गटचर्चासाठी इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ. सुनिल रजपूत, भूगोल विषयाचे प्रा.दयानंद कांबळे व राज्यशास्त्र विभागाचे प्रा.नागनाथ कबाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गट चर्चेमुळे विद्यार्थ्यांच्या विचाराला चालना मिळाली व भरपूर माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. रात्री ८ वा विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला. त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मनोरंजनातून प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

**सातवा दिवस:** शुक्रवार दि.३/१/२०२० रोजी शिबीराच्या सातव्या दिवशी विद्यार्थ्यांनी सकाळी लवकर उठून प्राणायम, योगासने केली. अल्पोपहारानंतर सकाळी ९ ते दुपारी १ दरम्यान श्रमदानामध्ये बाळेश्वर विद्यालयाच्या नियोजित जागेत वृक्षारोपन करण्यासाठी खड्डे खोदण्यात आले.



त्या खड्डयामध्ये समारोपाचे प्रमूख पाहूणे रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबादचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख व समारोपाचे अध्यक्ष मा.श्री.रामचंद्र आलुरे यांच्या हस्ते वृक्षारोपन करण्यात आले. दुपारी ठीक १.०० वाजता समारोपाचा कार्यक्रम बाळेश्वर मंदिरात घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक तथा कार्यक्रमाधिकारी प्रा.सुर्यकांत आगलावे यांनी शिबीराचा अहवाल सांगितला. तसेच अणदूरचे पत्रकार श्री. दयानंद काळुंके यांनी प्रबोधन पर गीत गावून विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत केले.



प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी यांनी स्वागतपर भाषण करतांना गावकऱ्यांचे आभार मानले व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रमूख पाहूणे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकास कसा करावा व शिबीरात मिळालेल्या माहितीचा आपल्या जीवनामध्ये कसा फायदा करावा याबद्दल मार्गदर्शन केले.



अध्यक्षीय समारोपात मा.श्री.रामचंद्र आलुरे यांनी गावकऱ्यांचे व विद्यार्थ्यांचे कौतूक केले व सहकार्याबद्दल आभार मानले.



काही विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन केले. गावकऱ्यांच्या वतीने प्रा.सुरेश ठोंबरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन व सुत्रसंचलन प्रा. डॉ.मल्लिनाथ बिराजदार व



लोकमत

# पुस्तकी ज्ञानासोबत सामाजिक ज्ञानही हवे

## आलुरे : बारूळ येथे रासेयो शिबिराची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

अणदूर : उच्च शिक्षणामुळे माणसाची प्रगती होते, हे जरी खरे असले तरी माणसाच्या आयुष्यामध्ये माणुसकीची शिदोरी जमा करायची असेल तर पुस्तकी ज्ञानापेक्षा सामाजिक ज्ञान असणे महत्त्वाचे आहे, असे मत बालाघाट शिक्षण संस्थेचे संचालक रामचंद्र आलुरे यांनी व्यक्त केले.

तुळजापूर तालुक्यातील बारुळ येथे अणदूर येथील जवाहर महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या सांगता समारंभात रामचंद्र आलुरे बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून रा. प. महाविद्यालयाचे प्राचार्य जयसिंगराव देशमुख, जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. उमाकांत चन्नशेट्टी, बारुळचे सरपंच शिवाजी सुपनार उपस्थित होते. शिबिरामध्ये 'पर्यावरण संवर्धनासाठी युवा' या मुख्य विषयांबरोबरच सेंद्रिय शेती व जल व्यवस्थापन, अंधश्रद्धा निर्मूलन, महिला सक्षमीकरण, महिला मेळावा, गाव स्वच्छता, शेतीपूरक व्यवसाय, श्रमदान, विविध कला गुणदर्शन आदी विषय हाताळण्यात आले.

कार्यक्रमाधिकारी प्रा. सूर्यकांत आगलावे यांनी शिबिराचा आढावा घेतला. सूत्रसंचालन अंजली बनसोडे यांनी तर आभार प्रा. एम. बी. बिराजदार यांनी मानले. यावेळी प्रा. जी. टी. राठोड, प्रा. सुरेश ठोंबरे, प्रा. आर. व्ही. वरशेट्टी, प्रा. एस. एस. रजपूत, प्रा. एस. जी. बिराजदार, प्रा. आर. एस. नळगे, प्रा. व्ही. जी. माने, प्रा. डी. एस. कांबळे, प्रा. सुरेखा भारती, प्रा. एन. एस. कबाडे, प्रा. एल. एस. राठोड, प्रा. प्रसन्न कंदले, नामदेव काळे, ओंकार मोकाशे, ऋचा मुळे, पी. के. कुलकर्णी यांच्यासह ग्रामस्थ, विद्यार्थी, प्राध्यापकांची उपस्थिती होती.

Hello Osmanabad
Page No. 3 Jan 07, 2020
Powered by: erelego.com

स्वयंसेविका अंजली बनसोडे यांनी केले.



शिबीर यशस्वी करण्यासाठी प्रा.सुर्यकांत आगलावे, प्रा.डॉ.गुंडू राठोड, प्रा.डॉ.मल्लिनाथ

बिराजदार, प्रा.नागनाथ कबाडे, प्रा.डॉ.सुरेखा भारती, प्रा.एल.एस.राठोड, श्री. नामदेव काळे स्वयंसेवक ओंकार मोकाशे व कु.ऋचा मुळे यांनी विशेष परिश्रम घेतले. गावातील सरपंच व सर्व सदस्य तसेच ग्रामस्थ यांनी शिबीरात सहभाग घेतला व सहकार्य केले.
















# Glimpses of NSS Camp at Barul- 2019-2020














7° 58' 30"; 76° 9' 29"  NW 9030
8.12.2019  19:37
33 E Trade St
harlotte, NC 28202, USA  fsf  fsdf
df  sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
वाहर महाविद्यालय अणदुर विशेष शिबीराचे उद्घघाटन बारूळ येथे
पन्न.


17° 58' 33"; 76° 9' 30"  NW -862
29.12.2019  10:26
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीरात सांडपाणी व्यवस्थापन


17° 58' 33"; 76° 9' 30"  NW 127
29.12.2019  11:19
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारुळ शिबीरात ग्रामस्वच्छता करताना जवाहर महाविद्यालयाच्या
विद्यार्थिनी


17° 58' 32"; 76° 9' 28"  NW 5251
29.12.2019  12:02
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीरात शोषखड्डा घेताना जवाहर महाविद्यालय अणदूरचे
विद्यार्थी


17° 58' 31"; 76° 9' 29"  NW -151
30.12.2019  12:48
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीरात श्रमदान


17° 58' 30"; 76° 9' 30"  NW 3622
30.12.2019  11:53
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीरात शोषखड्डा घेताना


17° 58' 31"; 76° 9' 30"  NW -6251
30.12.2019  11:41
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीरात सांडपाणीसाठी शोषखड्डा घेताना जवाहर
महाविद्यालय अणदूरचे स्वयंसेवक


17° 58' 30"; 76° 9' 30"  NW -9475
31.12.2019  11:09
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीर


17° 57' 21"; 76° 8' 48"  NW -511
31.12.2019  16:07
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA  fsf  fsdf
sdf  sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ येथे शिबीरात महिला सशक्तीकरण जनजागरण रॅली मध्ये
जवाहर महाविद्यालय अणदूरचे विद्यार्थी


17° 58' 30"; 76° 9' 29"  NW 933
31.12.2019  11:01
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA  fsf  fsdf
sdf  sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ शिबीरात सांडपाणी व्यवस्थापनासाठी शोषखड्डा घेताना
जवाहर महाविद्यालय अणदूरचे विद्यार्थी सोबत गावचे सरपंच श्री
सुपनार


17° 58' 30"; 76° 9' 30"  NW -2294
01.01.2020  20:29
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
शेतकरी मेळाव्यात सहभागी शेतकरी


17° 58' 30"; 76° 9' 30"  NW -10064
02.01.2020  08:26
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA  fsf  fsdf
sdf  sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ शिबीरात योगासने करताना जवाहर महाविद्यालय अणदूरचे
विद्यार्थी


17° 58' 29"; 76° 9' 29"  NW 8485
30.12.2019  19:58
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA  fsf  fsdf
sdf  sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ शिबीरात अंधश्रधा निर्मुलनावर प्रा. किरण सगर यांचे व्याख्यान


17° 58' 31"; 76° 9' 29"  NW 9382
01.01.2020  20:24
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीरात शेतकरी मेळावा


17° 58' 34"; 76° 9' 31"  NW -100
02.01.2020  11:21
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीरात वृक्षारोपन करताना


17° 58' 34"; 76° 9' 32"  NW -1830
02.01.2020  10:58
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA  fsf  fsdf
sdf  sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ शिबीरात वृक्षरोपनासाठी खड्डे खोदताना अणदूरचे कार्यक्रमाधिकारी


17° 58' 31"; 76° 9' 29"  NW 10100
30.12.2019  12:33
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA  fsf  fsdf
sdf  sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ शिबीरात शोषखड्डे खोदताना जवाहर महाविद्यालय अणदूरच
विद्यार्थी


7° 58' 33"; 76° 9' 31"  NW -7531
2.01.2020  12:37
33 E Trade St
harlotte, NC 28202, USA  fsf  fsdf
df  sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
ारूळ शिबीरात वृक्षाला पाणी घालताना  बारूळचे
रपंच,चेअरमन,ग्रामस्थ व विद्यार्थी


17° 58' 18"; 76° 9' 27" NW 3961
01.01.2020 13:15
Unnamed Road, Barul,
Maharashtra 413601, India
बारूळ शिबीरात वनराई बंधारा घेताना जवाहर महाविद्यालय
अणदूरचे विद्यार्थी


17° 58' 18"; 76° 9' 27" NW -9365
01.01.2020 13:43
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA fsf fsdf
sdf sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ शिबीरात वनराई बंधारा जवाहर महाविद्यालय अणदूर


17° 57' 52"; 76° 9' 21" NW 4280
02.01.2020 13:11
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA fsf fsdf
sdf sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ येथे बाळेश्वर विद्यालयाच्या आवारात वृक्षारोपनासाठी खड्डे
घेताना जवाहर महाविद्यालयाचे विद्यार्थी


17° 57' 52"; 76° 9' 21" NW 8478
02.01.2020 12:16
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA fsf fsdf
sdf sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ शिबीरात वृक्षारोपनासाठी खड्डे खोदताना जवाहर
महाविद्यालय अणदूरचे विद्यार्थी


17° 57' 52"; 76° 9' 22" NW 7957
03.01.2020 12:44
333 E Trade St
Charlotte, NC 28202, USA fsf fsdf
sdf sdf fsdf sfsdf sdf fssdf sdf
बारूळ शिबीरात समारोपाचे पाहुणे यांच्या हस्ते वृक्षारोपन


17° 58' 10"; 76° 9' 7." NW -7305
03.01.2020 14:01
Barul, Maharashtra, India
बारूळ शिबीर समारोप